<u>दिनांक – ०५/०७/२०२५</u>

**<u>शपथेवर पुढील उलटतपास आरोपी नं. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री. पी.जी. शिंदे यांचेमार्फत सुरु</u>**

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या आरोपीने त्यांच्याकडे परत करण्यासाठी रोख रक्कम नाही असे म्हणाले त्या आरोपीचे नाव माझ्या नोटीस, निशाणी १ आणि शपथपत्रामध्ये नमुद केलेले नाही.

**२१.** कोरोना काळात मी गावी होतो. असे घडले नाही की, मी कोरोना काळात परगावी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, कोरोना काळात एखाद्या व्यक्तीला गावातून बाहेर जायचे असल्यास त्या व्यक्तीला कोरोनाची लागण झाली आहे किंवा नाही याची तपासणी करुन खात्री केल्याशिवाय त्या गावाबाहेर सोडत नसत. हे म्हणणे खरे आहे की, कोरोना काळात एखादा व्यक्ती बाहेरुन गावामध्ये आल्यास त्या व्यक्तीला आधी क्वारंटाईन व्हावे लागत आणि त्याला कोरोना नाही याची तपासणी खात्री करुन त्या व्यक्तीला त्याच्या कुटुंबात सोडत असत. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०८/०३/२०२२ रोजीची नोटीस कोणत्या आरोपीला पाठविली याचा उल्लेख नोटीस निशाणी १ आणि शपथपत्रामध्ये केलेला नाही.

**प्रश्न –** तुम्ही आरोपी क्र. १ यांना मुंबईतील त्यांच्या राहत्या घराच्या पत्त्यावर नोटीस पाठविली नाही ?

**उत्तर –** आरोपी क्र. १ च्या दुकानावर नोटीस पाठविली आहे. आरोपी क्र. १ मुंबईत स्वतःचे राहते घर नव्हते ती किरायाच्या घरात राहत होती.

**२२.** हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपी क्र. १ व २ यांच्या किरायाच्या घरच्या पत्यावर नोटीस पाठवायला अडचण नव्हती. हे माझ्या डोक्यात आले नाही की, आरोपी क्र. २ यांना त्यांच्या काम करण्याच्या ठिकाणी नोटीस पाठविता आली असती किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ मुंबईतील तिच्या तीनही व्यवसायाच्या ठिकाणी एकाच वेळी आढळून येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ त्या काळात त्याच्या अग्नीशामक दलाच्या कार्यालयात जाऊन नोकरी करीत होता. हे म्हणणे खरे नाही की,

आरोपी क्र. २ नोकरी असणा–या दिवशी मिसळ कट्टा या आरोपी क्र. १ च्या व्यवसायाच्या ठिकाणी येत नाहीत. हे मला सांगता येणार नाही की, दिनांक १६/०३/२०२२ रोजी आरोपी क्र २ हा मिसळ कट्टा हॉटेल येथे नव्हता अगर कसे. हे मला सांगता येणार नाही की, दिनांक १६/०३/२०२२ रोजी आरोपी क्र १ ही मिसळ कट्टा हॉटेल येथे नव्हती अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, कोरोना काळात सर्व व्यवसाय बंद होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १६/०३/२०२२ रोजी कोरोना कार्यकाळ होता. हे मला सांगता येणार नाही की, दिनांक १६/०३/२०२२ रोजी आरोपी क्र. १ यांचे हॉटेल बंद होते किंवा कसे. हे मला माहिती नाही की, दिनांक १६/०३/२०२२ रोजी आरोपी क्र. १ यांचे हॉटेल बंद होते व आरोपी त्याठिकाणी नव्हता तरी पोस्टमनने लिफाफ्यावर रेफ्युजड असा खोटा शिक्का मारला आहे किंवा कसे. हे मला लक्षात नाही की, कोरोना कार्यकाळ हा मार्च २०२१ ते सप्टेंबर २०२२ पर्यंत होता किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, मी आरोपी क्र. १ व २ यांना पाठविलेली नोटीस कोरोना काळ असल्यामुळे त्यांना मिळाली नाही किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, आरोपींना मी पाठविलेला नोटीसा मिळाल्या नसल्यामुळे आरोपींना नोटीस उत्तर देता आले नाही किंवा कसे.

**२३.** हे म्हणणे खरे नाही की, मी दोन लाख पन्नास हजार रुपये हातऊसने देण्यास सक्षम नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कधीही दोन लाख पन्नास हजार रुपये हातऊसने मागितले नाहीत आणि मी त्यांना दोन लाख पन्नास हजार रुपये कधीही हातउसने दिले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ यांनी त्यांचे धनादेश हरविले आहेत अशी तक्रार पोलीस स्टेशन मुंबई येथे दिली होती ही बाब मला माहिती होती. हे मला माहिती नाही की, आरोपीच्या हरविलेल्या धनादेशापैकीच एक धनादेश म्हणजे वादग्रस्त धनादेश आहे किंवा कसे. हे मला माहिती नाही की, २०,०००/– च्या वरचे व्यवहार हे धनादेश किंवा बॅंकेमार्फत करायचे असतात किंवा कसे.

**प्रश्न –** तुम्ही दोन लाख पन्नास हजार रुपये बॅंकेद्वारे पाठवू शकला असता ?

**उत्तर –** आरोपींनी रोख पैसे मागितले होते.

सं. फौ. ख. क्र. २१३/२०२२
दिलीप वि. कविता
नि. क्र. २४

**२४.** हे मला माहिती होते की, आरोपीचे बँकेत खाते आहे. हे मला आठवत नाही की, मी माझे बँकेचे खाते कधी सुरु केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला दोन तीन वर्षापूर्वी घडलेल्या घटना आठवत नाहीत. असे घडले नाही की, मी कोरोना काळात मुंबईला गेलो होतो आणि मला क्वारंटाईन केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला हातउसने पैसे दिले नाहीत आणि आरोपींनी मला वादग्रस्त धनादेश दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे हरविलेले धनादेश मला सापडले व त्या धनादेशाचा गैरफायदा घेऊन मी माझ्या हस्ताक्षराने मजकूर लिहून त्या आधारे धनादेश अनादरीत करुन आरोपींना खोटी नोटीस पाठविली, खोटे शे–याचे लिफाफे तयार केले, खोटी तक्रार दाखल केली आणि आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ ला पैसे दिले नसल्यामुळे आरोपी क्र. १, माझे कायदेशीर देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**आरोपी क्र. २ यांचे वकील पटेल यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब, आरोपी क्र. २ तर्फे उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.07.07 10:54:08 +0530

दि.०५/०७/२०२५ **( आर. बी. कुलकर्णी )**
आटपाडी. सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग आटपाडी